कार्यपुस्तिका

मराठी

बालभारती

वर्ग पहिला

बोलीभाषा पावरी

केवळ आदिवासी आश्रमशाळांमध्ये मर्यादित वितरणासाठी

मराठी

बालभारती

वर्ग पहिला

कार्यपुस्तिका - बोलीभाषा : पावरी

बोलीभाषा अनुवाद प्रकल्प,
आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे.

अनुवाद प्रकल्प समिती

अध्यक्ष : डॉ. किरण कुलकर्णी

आयुक्त, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे.

कार्यगट : दिनेश पावरा, सयाजी पावरा, वसंत पावरा

कार्यपुस्तिका : लेखन - दिनेश पावरा, सयाजी पावरा

चित्र : दिपक संकपाळ

मांडणी : मिलिंद जोशी, मंगला घरडे, मेघा चवले

संकल्पना व संयोजन : मितानीन फाउंडेशन, पुणे

कार्यपुस्तिका समजून घेतांना...

आवाहन

महाराष्ट्राच्या दुर्गम भागात राहणाऱ्या आणि आश्रमशाळेत शिकणाऱ्या पहिल्या वर्गाच्या आदिवासी मुला-मुलींसाठी पहिलीच्या बालभारती मराठीच्या पाठ्यपुस्तकाचा त्या त्या बोलीभाषेत अनुवाद करण्याचा उपक्रम आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबवण्यात आला आहे. बोलीभाषेत अनुवाद केलेल्या पाठ्यपुस्तकाचा शिक्षकांनी कसा वापर करावा याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आश्रमशाळेतील शिक्षकांनीच प्रायोगिक तत्त्वावर (आणि खासगी वितरणासाठी) या कार्यपुस्तिका तयार केल्या आहेत. यात इतर शिक्षकांकडूनही अधिक सुधारणा, दुरुस्त्या, वर्गशिक्षणाच्या नव्या कल्पना अपेक्षित आहेत. अशा सूचनांचे आम्ही सहर्ष स्वागत करतो.
विभिन्न बोलीभाषा बोलणाऱ्या आदिवासी मुला-मुलींचा मराठी भाषेशी मैत्रीचा सांधा जुळावा आणि त्यांचे मराठीमधील पुढील शिक्षण सुगम व्हावे म्हणून हा प्रयत्न. हा प्रयत्न अधिक प्रशस्त आणि प्रभावी व्हावा यासाठी आवाहन.

अनुवाद प्रकल्प समिती
अध्यक्ष : डॉ. किरण कुलकर्णी
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

कार्यपुस्तिका तयार करताना काही प्रमुख बाबींवर अधिक जोर देण्यात आला. त्या पुढीलप्रमाणे. शिक्षकांनी कार्यपुस्तिका सुरू करण्यापूर्वी या बाबी अवश्य लक्षात घ्याव्यात.

- ☞ बोलीभाषेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मराठीची समज रुजविणे हा कार्यपुस्तिकेचा मुख्य उद्देश.
- ☞ कार्यपुस्तिका, ४ भागात विभागली आहे. १) चित्रकथा २) अक्षर ओळख ३) कविता व गाणी ४) कथा-वाचन पाठ.
- ☞ ‘माझे पान’ आणि ‘वाचन व लेखनपूर्व तयारी’ यावर विशेष भर आहे.
- ☞ ‘अक्षर-ओळख’ ही भाषा आत्मसात करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असते. अक्षरांकडून शब्दांकडे नेणे, अक्षरांचे दृढीकरण करणे व त्यानंतर त्या अक्षरांपासून तयार होणाऱ्या शब्दांचा वाक्यात उपयोग करून सराव करून घेणे, आणि याद्वारे वाचन व लेखन प्रक्रिया पुढे नेणे. यासाठी

बोलीभाषेतील शब्दांची मदत घेण्यात आली आहे.

- ☞ अक्षर-ओळख, त्यातून शब्द पाहणे, शब्द ऐकणे, शब्द बोलणे, शब्द वाचणे, शब्द लिहिणे, अर्थ समजणे, शब्द अन् वस्तू, याचा संबंध जोडणे तसे शब्द-वाक्य यातून कल्पना उमजणे या सर्व प्रक्रियांसाठी बोलीभाषेची मदत घेण्यात आली आहे.
- ☞ आपल्या भाषेत बोलण्याचे, चर्चा करण्याची, तसेच प्रश्न विचारण्याची मोकळिक विद्यार्थ्यांना मराठीशी सलगी करण्यात मदत करेल.
- ☞ चित्रकथा बघून वाचण्याची, त्यावर चर्चा करण्याची, आपल्या गावातील, पाड्या किंवा टोल्यावरील स्थितीशी तुलना आणि सारखेपणा शोधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी. उदा. चित्रामधील खेळ आणि मुल आपल्या घरी खेळत असलेले खेळ, यांच्या संबंधातून 'खेळ' ही कल्पना स्पष्ट होईल.
- ☞ चित्रांचे बारकाईने निरीक्षण करणे, बघितलेल्या, ऐकलेल्या गोष्टींची चित्रं, रेखाटन जसे असतील तसे उतरविणे व त्यावर गटात चर्चा करणे. (सुरुवातीला बोलीभाषेत अशा चर्चा होतील.) अशी संधी विद्यार्थ्यांना मिळावी. याद्वारे ते बोलते होतील.
- ☞ कविता, गाणी, कथा यातील शब्दांच्या गंमती किंवा शब्द-जोडीतील ठेका, 'ध्वनी' मधली विविधता या सर्वांचा विद्यार्थ्यांना अनुभव घेता यावा अशी संधी देणे.
  उदा. निजल-रूजल, भिंगरी-झिंगळी, लोठ्ठेबाबा-पोटेबाबा.
- ☞ प्राणी, पशु-पक्षी यांचे ध्वनी काढण्यास तसेच त्यांची घरटी तयार करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे. याद्वारे त्यांचे वर्ग शिक्षणात समायोजन लवकर होऊ शकेल.
- ☞ अक्षर-शब्द-वस्तु याचा संबंध दृढ करण्यासाठी विविध कृती, जसे, सावली-झाडाची, हाताची, डोक्याची, शाळा परिसरातील वस्तु इ. याचा संबंध विद्यार्थ्यांना लावू द्यावा.
- ☞ अक्षरांचा वळणदारपणा बघण्यापेक्षा अक्षराची आकृती अन् त्याचा शब्द-संबंध अधिक बघावा.
- ☞ घरी, गावात, पाड्यांवर, टोल्यांवर बघितलेल्या वस्तु किंवा चित्र यांना बोलीभाषेतून बोलण्याला अन् लिहिण्याला प्रोत्साहित करावं.
- ☞ प्रश्न विचारायला संधी देणे तसेच बोलीभाषेत का होईना व्यक्त होण्यास प्रोत्साहित करावे, विद्यार्थ्यांचेच गट पाडून, त्यांना परस्परांना प्रश्न विचारून उत्तर देण्याचा खेळ वर्गात घेणे.

जन्मापासून ते शाळेत पहिल्या वर्गात दाखल होईपर्यंत आश्रमशाळेतील मुला-मुलींच्या कानावर, त्यांच्या अनुभवात त्यांची बोलीभाषाच असते. शाळेत आल्याबरोबर लगेच त्यांचे 'मराठी'मधून शिक्षण सुरू होते. आदिवासी मुला-मुलींच्या एकूण शिक्षण-प्रक्रियेतील हा मोठा धक्का असतो. यामुळे कदाचित त्यांचे सर्व पुढील शिक्षण प्रभावित होऊ शकते. बोलीभाषेकडून मराठी शिक्षणाकडची वाट सुगम अन् खेळकर व्हावी म्हणून ही कार्यपुस्तिका. अर्थात आश्रमशाळांमधील शिक्षकांनी परिस्थिती अन् गरजेनुसार ही कार्यपुस्तिका उपयोगात आणावी. यात काही बदल किंवा भर टाकावयाची असेल तर त्याबद्दल जरूर कळवावे.

●

माझे पान

(शिक्षकांसाठी)

- **प्राण्यांच्या चित्रावर बोट ठेवून मोठ्या आवाजात त्यांची नावं सांगा.**
- **विद्यार्थ्यांना शक्य त्या प्राण्याचे वर्णन करायला सांगून त्या प्राण्याचे आवाज काढायला सांगा.**
- **गटातून अशी कृती घेता येऊ शकते.**
- **चित्रात नसलेले पण विद्यार्थ्यांच्या ओळखीचे प्राणी कोणते?**

हे विचारून, त्या प्राण्याचे खाद्य, आवाज, त्याचं पिल्लू याबाबत विचारा.

चित्रात कोण कोणते प्राणी दिसतात?

चित्रो देख, चित्राम काय काय देखाये च्यो कोय.

जनावरोन नावे कोयू?

- विद्यार्थ्यांना जवळ बोलवून बोट ठेवून विचारणे.
- चित्रे वाघ सिंह - बोली भाषेत विचारणे.
- अजून मुलांना माहित असलेले शब्द विचारा.
- मुलांना बोलके करा.

विद्यार्थ्यांना प्राण्यांचा आवाज काढायला लावा.

बुकळी आवाज काढ?

कुत्राना आवाज काढी दखाळ?

मांजेरना आवाज कशा रहय?



बुकळी (बकरी)

चिडी (चिमणी) (खेकडा)

(कबुतर) (मुंगी)

(कोंबडा) (कावळा)

(पाल) (डुक्कर)

(काळी कोंबडी) (उंदीर)

(बिबट्या) (अस्वल)

(विंचू) (कोल्हा)

(मांजर) (साप)

चित्र कथा

मार खेल (माझे खेळ)

चित्रो देख, चित्राम काय काय देखायेह च्यो कोय. (चित्र बघ, चित्रात काय काय दिसते ते सांग?)



चित्र १ **आंधळी कोशिंबीर**

१. चित्राम कोतरा पुऱ्या खेलने बाजा रोया हा?

(चित्रात किती मुले खेळत आहेत?)

२. तुमू यु खेल खेलतला काय?

(तुम्ही हा खेळ खेळता काय?)

३. पुऱ्या कारलु खेल खेलता?

(मुले कोणता खेळ खेळत आहे?)

चित्र २ **गुडू खिपरी** (लगोरी)

१. गुडू खिपरी खेलणे काय-काय जुवतलो?

(लगोरी खेळायला कोण-कोणते साहित्य लागते?)

२. गुडू खिपरी कोतरा जणा खेलतला?

(लगोरी किती मुले खेळतात?)

३. चित्रामा कोतरा पुऱ्या एने पुरायटा (सुरी) देखाये?

(चित्रात किती मुले आणि मुली आहेत?)

चित्र ३ **कॅरम** (कॅरम)

१. कॅरम खेल तुमू देखरोया काय?

(कॅरम खेळ बघितला आहे का?)

२. कॅरम कोतरा जण खेलतला?

(कॅरम किती खेळाडू खेळतात?)

३. कॅरम खेळणे कोतरा गुटा रोयतला?

(कॅरम खेळात किती गोट्या असतात?)

चित्र ४ सापसीडी (सापसीडी)

१. तुमू सापसीडी खेलतला काय?

(तुम्ही सापसीडी खेळता काय?)

२. चित्राम सापसीडी कोतरा पुऱ्या खेलणे बाज रोया?

(चित्रात किती मुले सापसीडी खेळत आहेत?)

३. सापसीडी केहे खेलतला च्यो कोयू?

(सापसीडी कसे खेळतात ते सांगा?)

मार खेल (माझे खेळ)

(शिक्षकांसाठी)

◆ विद्यार्थी गावी अन् शाळेत काय खेळतात?

हे विचारून त्यांना खेळांची नावं आणि त्याचे वर्णन करण्यास प्रोत्साहित करा. खेळ, जसे - लंगडी, टिक्कर बिल्ला, भस्सम कंचे, चौरस किंवा चौआष्टा इ.

इतर खेळाचं नावं - क्रिकेट, कबड्डी, खो-खो, गिल्ली-दांडू, सुरकाडी, खूपसणी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुद्धीबळ इ.

◆ वैयक्तिक खेळ : (एकट्याने खेळावयाचे) आणि
  सामुहिक खेळ : (चमूने खेळावयाचे) यातील फरक सोदाहरण सांगा.

मारू जुडीदार / दुस्ती (माझे मित्र)

चित्रो देख, सोमोव, तारा जुडीदारोन बारामा कोय?
(चित्र बघ, ऐक, तुझ्या मित्राविषयी सांग.)

मारा खूब होनटा जुडीदार/ दुस्ती सेता.
(माझे खूप सारे मित्र आहेत?)

चित्र क्र.१

१. तुमरा दुस्ती से काय?
(तुमचे मित्र आहेत काय?)

२. तुमरा नानला एने मोटलां दुस्ती से काय?
(लहान-मोठे मित्र आहेत का?)

३. चित्रामा कोतरा दुस्ती से?
(चित्रात किती मित्र आहेत?)

चित्र क्र. २

१. चित्रामा उडणारा कानला-कानला दुस्ती/जुडीदार देखाये?
(चित्रामध्ये कोण-कोणते उडणारे मित्र दिसतात?)

२. तुमरा उडणारा दुस्ती/जुडीदार से काय? कानला कानला?
(तुमचे पण उडणारे मित्र आहेत काय? ते कोणकोणते?)

चित्र क्र.३

१. चित्रामा सेमटीवाला एने बिना पायवाव दुस्ती/जोडीदार कानला?
(चित्रात शेपटी असणारे आणि पाय नसणारे मित्र कोणकोणते?)

२. तुमरा भी सेमटीवाला एने बिना पायवाला दुस्ती/जोडीदार से काय?
(तुमचे पण शेपटीवाले व पाय नसणारे मित्र आहेत काय?)

चित्र क्र. ४

१. चित्रामा पानीमायला कानला कानला दुस्ती/जोडीदार देखाये?
(चित्रात पाण्यातील कोणते कोणते मित्र दिसत आहेत?)

२. तुमरा भी पानीमायला दुस्ती/जुडीदार सेता काय?
(तुमचे पण पाण्यातील मित्र आहेत काय?)

मारू जुडीदार / दुस्ती (माझे मित्र)

१. जमिनीपोर गिहाईन चालणारा जनावरे कानला? तिंनदरा नावे कोयू?

(जमिनीवर सरपटणारे प्राणी कोणते? त्यांची नावे सांगा.)

२. उपोर उडणारा जनावरे कानला? तिनदरा नावे कोयू?

(आकाशात उडणारे प्राणी कोणते? त्यांची नावे सांगा.)

३. दोरोमायला जनावरे कानला? तिनदरा नावे कोयु?

(बिळात राहणारे प्राणी कोणते? त्यांची नावे सांगा.)

४. पानीमायला जनावरे कोणता? तिनदरा नावे कोयू?

(पाण्यात राहणारे प्राणी कोणते? त्यांची नावे सांगा.)

५. जंगलोमायला जनावरे कानला? तिनदरा नावे कोयू?

(जंगलात राहणारे प्राणी कोणते? त्यांची नावे सांगा.)

६. गावमा रोयणारा जनावरे कानला? तिनदरा नावे कोयू?

(गावात राहणारे जनावरे कोणती? त्यांची नावे सांगा.)

(शिक्षकांसाठी प्रस्तावित उपक्रम)

- पाठ शिकविताना विचारा.
- विद्यार्थ्यांनो, तुमचे इतर मित्र कोण?
- जे बोलत नाहीत, सगळेच जवळ येत नाहीत. पण आसपास राहतात, आपल्याला आनंद देतात.

असे कोण? - कुत्रा, मांजर, गाय, वासरू, चिमणी, पोपट, कबुतर, फुलपाखरू.

- **प्राण्यांची नावं -** (श्रेणीनुसार) - तोंडी वदवून द्या. जसे,

- सरपटणारे, उडणारे, शेपटी असणारे, बिळात राहणारे, पाण्यात राहणारे, पाळीव (घरचे, पाड्यावरचे), जंगलात राहणारे.

- प्राण्यांची नावं, बोलीभाषा, मराठी आणि शक्य तिथे इंग्रजीमधून, चित्र दाखवून मुलांकडून वदवून घ्या.
- श्रेणीनुसार किमान एका प्राण्याचे तोंडी वर्णन करायला सांगा. प्राण्यांचे आवाज गटाकडून काढून घ्या.
- गटांमध्ये विभागून, भेंड्या, अंताक्षरी किंवा सांगा कोण? असे खेळ घेता येऊ शकतात.

मार घोरल्या (माझे कुटुंब)

आपनो घर ऐने घोरल्याणबारामा कोयू?
आपले घर व कुटुंबाबद्दल सांगा.

आजी - (डाहलाई), आजोबा (डाहलुबाबू), आई (आया), बाबा (बाबू), दादा (दादू), ताई (बाय), मी (मी/मे)
चित्र परिचय - मुलांना चित्र, वाचायला सांगा.

↓ या चित्राचे निरीक्षण करायला सांगून, विद्यार्थ्यांना वर्णन करू द्यावे.



चित्र परिचय (मुलांना चित्र वाचायला सांगा.)
बोलीभाषेत विचारा. पाठातील चित्र.

चित्र क्र. १

१. चित्रामा कुण-कुण से?
(चित्रामधे कोण-कोण आहेत?)

२. घरमा काय काय देखाये?
(घरात कुठल्या वस्तू आहेत?)

३. कुण-कुणीहाते बुले?
(कोण कोणा सोबत बोलत आहेत?)

४. -पुराय कुणीनचा जाय?
(मुलगी कुणाकडे जात आहे?)

चित्र क्र.२

१. पुरायोन बाबू का से?
(मुलीचे बाबा कोठे आहेत?)

२. पुरायोन बाबू काय कोरे?
(मुलीचे बाबा काय करत आहेत?)

चित्र क्र. ३

१. पुरायोन दादू काय कोरने बाज रोयू?
(मुलीचे दादा काय करत आहे?)

२. पुऱ्या कानलू खेल खेलने बाज रोया?
(मुले कोणता खेळ खेळत आहे?)

चित्र क्र. ४

१. चित्रामा कून- कून देखाये?
(चित्रात कोण कोण दिसतंय?)

२. डाहलाई ऐने डाहबाबू का बोठ गया?
(आजी आणि आजोबा कुठे बसले आहेत?)

झोपाळा गेला उडून

(बोली भाषेत विचारा)

१. चित्रामा काय-काय देखाये?

(चित्रात काय दिसते?)

२. डेडका काय कोरने बाज रोया?

(बेडूक काय करत आहे?)

चित्र क्र. २

१. डेटका कायतापोर बोठ रोया?

(बेडूक कशावर बसले आहे?)

२. तुमू बी हिंदवायतला काय?

(तुम्ही पण झोका घेता काय?)

चित्र क्र.३

१. चित्राला काय बदल होयलू देखाये?

(चित्रात काय बदल झालेला दिसत आहे?)

चित्र क्र. ४

१. चित्रामा दुसरो कुण देखाये?

(चित्रात नवीन कोण दिसत आहे?)

२. डेटका हिंदवू का बांध रोयला?

(बेडकांनी झोपाळा कुठे बांधला होता?)

(शिक्षकांसाठी)
-याच धर्तीवर विद्यार्थ्यांना 'कबुतरं उडून गेलीत' ही कथा सांगावी.
- (शिकारी - जाळं - दाणे- कबुतरांचे अडकणे आणि एकी करून सर्वांनी जाळं घेऊन उडून जाणे.)



मारी शाळा (माझी शाळा)

चित्र बघ, चित्रात काय-काय दिसते ते सांग.
(चित्रो देख, चित्राम काय-काय देखाये च्यो कोय?

चित्र क्र. १

१. कायतान चित्रो देखाये?
(कशाचे चित्र दिसते आहे?)
२. चित्राम काय काय देखाये?
(चित्रात काय काय दिसते आहे?)
३. पुऱ्या काय खेलणे बाज रोया?
(मुले काय खेळत आहेत?)

चित्र क्र. २

१. चित्रामा कुण-कुण देखाये?
(चित्रात कोण-कोण दिसते आहे?)
२. पुऱ्या काय कोरिन देखले?
(मुले काय करून दाखवत आहेत?)
३. भितडापोर कायतान चित्रा देखायतां?
भिंतीवर कशाचे चित्र दिसते आहे?

विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेचे वर्णन करायला सांगणे. तसे प्रश्न विचारावे.
उदा. किती वर्ग खोल्या आहेत?
किती शिक्षक आहेत?
शाळेला रंग आहे का?
असल्यास कुठला?
कुठली झाडं आहेत?
फळांची किती?
फुलांची किती?

चित्र क्र. १



चित्र क्र. २

गंमती शोध

चित्र बघ, त्यातल्या गंमती शोध, सांगा.

१. चित्रामा काय काय देखाये?

(चित्रात काय काय दिसते?)

२. कुकळीह कानटा रोयतला काय?

(कोंबडीला कान असतात काय?)

३. मोबाइलपर कुण बुलने बाज रोयो?

(मोबाइलवर कोण बोलत आहे?)

४. चित्रामा वाघ काय कोरने बाज रोयू?

(चित्रात वाघ काय करतोय?)

५. चित्रामा हासने सारखी काय वात देखाये?

(चित्रात काय काय गंमत दिसते आहे?)



कुत्रा मांजर काय बोलतात

चित्र बघ, कुत्रा, मांजर काय बोलत असतील ते सांग.
(चित्र देख, कुत्रु ऐने मांजरो काय वातू कोरते च्यो कोय.)

१. चित्रामा कुण-कुण देखाये?
(चित्रात कोण कोण दिसत आहे?)
२. मांजराक कोतरा पिला से?
(मांजरीला किती पिल्लू आहे?)
३. मांजरान पिला काय-काय कोरने बाज रोया?
(मांजरीचे पिल्लं काय करत आहेत?)
४. झुपलानचा कुण आवीन उभरोयू?
(दरवाजाजवळ कोण येऊन उभा आहे?)
५. कुत्रू ऐने मांजरो या दुयमा काय वात होई होसे ची कोयू?
(कुत्रा आणि मांजर या दोघांमध्ये काय बोलणे झालं असेल ते सांगा.)

चित्रात किती पिल्लं आहेत?
- **विद्यार्थ्यांना मोजून वर्णन करायला सांगा.**
- **विद्यार्थ्यांनी अजून इतर कुणाची पिल्लं बघितली आहेत. ते विचारा.**
- **चित्राचे बारकाईने निरीक्षण करून बोलायला सांगा.**



मांजराची गंमत

चित्र देख, कहानी कोय. (चित्र बघा, गोष्ट सांगा.)

चित्र क्र. १

१. चित्रामा काय-काय देखाये?
(चित्रात काय काय दिसत आहे?)
२. मांजरो काय लेणे बाज रोयो?
(मांजर काय घेत आहे?)

चित्र क्र.२

१. चित्रामा मांजरो काय देख लेतलो?
(चित्रात मांजराने काय पाहिले?)
२. उंदरू काय कोरने आव रोयु?
(उंदीर काय करायला आला?)

चित्र क्र. ३

१. चित्रामा मांजरो काय कोरे?
(चित्रात मांजर काय करतेय?)
२. उंदरू मांजराक देखीन काय करतलू?
(उंदीर मांजराला बघून काय करतो?)

चित्र क्र. ४

१. उंदरू का भोराय जातलू?
(उंदीर कुठे घुसतो आहे?)
२. मांजरो मुंहके हात कहा लागाल लेदू?
(मांजराने डोक्यावर हात का मारला?)

प्रश्न

१. या आखा चित्रा जुळीन काहानी बोनावू. ऐने कोयू?
(हे सर्व चित्र जोडून गोष्ट बनवा आणि सांगा.)

२. तुमू घर कारला-कारला जनावरे पावतला?
(तुम्ही घरी कोणकोणते जनावरे पाळतात?)



बाजार (हाट)

चित्रो देख, चित्रामा काय काय देखाये च्यो कोय.
चित्र बघ, चित्रात काय काय दिसते ते सांग.
- पाठातील चित्रावर आधारित पुढील प्रश्न विचारा.

१. तुमू हाट देख रोया काय?
(तुम्ही बाजार बघितला आहे का?)
२. तुमरां गावमां हाट भोरायतलू काय?
(तुमच्या गावात बाजार भरतो का?)
३. हाट देखणे तुमू का जातला?
(बाजार बघायला तुम्ही कोठे जाता?)
४. हाटोमा काय काय रोयतलो?
(बाजारात काय काय असते?)
५. हाटोमा देखा तुम काय काय लावतला?
(बाजारातून तुम्ही काय काय आणता?)
६. हाटोमा तुमू कुणी हाते जातला?
(बाजारात तुम्ही कोणासोबत जाता?)

हा तुमच्या गावाचा बाजार. विद्यार्थ्यांना चित्राचे वर्णन करून स्वतः कुटुंबासह बाजार करीत असल्याची कल्पना रंगवायला सांगा. (गटामध्ये ही कृती होऊ शकते.)



जत्रा (जात्रा)

चित्र देख, चित्राम काय काय देखाये च्यो कोय.(चित्र बघ, चित्रात काय काय दिसते ते सांग.)
(पाठातील चित्रावर आधारित प्रश्न विचारा.)

१. तुमू जात्रा देख रोय काय?
(तुम्ही यात्रा बघितली आहे का?)
२. तुमरा गावमा जात्रा भोरायतली काय?
(तुमच्या गावात यात्रा भरते का?)
३. तुमरा गावमा कानला देवोन जात्रा भोरायतली?
(तुमच्या गावात कोणत्या देवाची यात्रा भरते?)
४. जात्रा देखणे तुमू कुणी हाते जातला?
(यात्रा बघायला तुम्ही कोणासोबत जाता?)
५. तु जात्रामा काय-काय देखलू?
(तू यात्रेत काय-काय बघितले?)

तुमच्या गावातील जत्रा अशी असते का?
विद्यार्थ्यांना या चित्रात स्वत:ला ठेवून कल्पना रंगवायला सांगा.
(गटांमध्ये ही कृती होऊ शकते.)







वाचन पूर्व
व
लेखनपूर्व तयारी

जोड्या लागवे (जोड्या जुळव)

जोड्या जुळव. (शिक्षकांसाठी)

◆ प्रत्यक्ष कृती. मी आणि माझी सावली.

◆ उन्हात उभे राहिल्यावर आपल्या मागे, पुढे, आजुबाजुला काय पडते? विद्यार्थ्यांना कृती करू द्या. बोलीभाषेतील 'सावली'चा समानार्थी शब्द असल्यास तो वापरावा.

◆ विद्यार्थ्यांना एकमेकांच्या सावल्यांची जोडी जुळवायला सांगा.

◆ परिसरातील वस्तु (झाड, खांब, इमारत इ.) आणि त्यांच्या सावल्या यांचा तोंडी निर्देश करावा. विद्यार्थ्यांकडून तो मोठ्या आवाजात करवून घ्यावा.

◆ सराव घट्ट करावा. लहान-मोठी होणारी सावली विद्यार्थ्यांना अनुभवू द्या.

अशाप्रकारे सराव घ्या.



जोड्या लावा

चित्र बघ. नाव सांग. नाव दाखव. जोड्या लाव.



कप	मासा	लाटणे	पालक
कप	**मासा**	**वेलन**	**पालक**
उपयोग	पाण्यात राहतो	उपयोग	आंबट चूका
चहा प्यायला	**पाणीम रहय.**	**गहून रुटू बोनावणे**	मेथा
चहा पिणे	इतर दोस्त	पोळ्या बनवायला	गड्डूकोबी
इतर दोस्त	कोचायलो	इतर दोस्त	अंबाळी
बरशी	केकळो	चिमटू	खाटखुल्या
वाटकी	गिचा	साणशी	
ताट	मगर	झारू	
टाट			

जोड्या जुळवा

कप	**वेलन**
पालक	**मासा**
मासा	**पालक**
लाटणे	**कप**

गिरव



गिरव












अक्षरओळख
क
काकळो
कडच्यो
कुकळू
कादव
काकडी
कुकळी

क म आ ल ा



‘क’ बघ. ‘क’ ला ◯ कर.

कुकळू : कुकळू दाणा खाय.

(कोंबडा दाणे खातोय.)

कडच्यो : मारो कडच्यो दुखे.

(माझी कंबर दुखतेय.)

काकडो : आमू काकडो खाजे.

(आम्ही काकडी खातो.)

कादव : घर बनावणे कादव जुवतलू.

(घर बनवायला माती लागते.)

बुकळी : बुकळी चारू खाय.

(बकरी चारा खाते.)

गिरव, लिही, म्हण.



मासू (मासा)

मोखळो (माशी)

म

मुवळा (मोहाची फुले)

मोकळ्यो (माकड)

मुकाय (मक्का)

बाणाचे बिंदू जोडा

'म' बघ. 'म' ला ○ कर.

मासू : मासू पानीमा फिरेह.
(मासा पाण्यात फिरतो.)

मामू : मामू आमरे घर आव्यू.
(मामा आमच्या घरी आले.)

मोखळो : मोखळा रूटापर बोठ रोयाह.
(माश्या भाकरीवर बसलेली आहेत.)

मुकाय : मुकायोन रूटू से.
(मक्क्याची भाकरी आहे.)

माकळ्यो : माकळ्यो झाडोपर बोठ्यो.
(माकड झाडावर बसला.)

मुवळा : मुवळा चुटणे चालू.
(मोहाची फुले वेचायला चला.)

गिरव, लिही, म्हण.

म

म म म म

म



'आ' बघ. 'आ' ◯ कर.

आंबू : रोहन आंबु लिन आवलु.

(रोहन आंबा घेऊन आला.)

आमलो : आमू आमला खाणे जाजे.

(आम्ही चिंच खायला जातो.)

आया : आया पाणी भोरणे गोयी.

(आई पाणी भरायला गेली.)

आरसू : अंकिता आरसामा देखतली.

(अंकिता आरश्यात बघते.)

आंधारो : आंधारो देखीण बिक लागतली.

(अंधार बघून मला भिती वाटते.)

गिरव, लिही, म्हण.

आ

आ आ आ आ

आ

लुगळा
(कपडे)

लोहोण
(लसूण)

ल

लाडी
(नवरी)

लावरो (लावरी)

लाकळो
(लाकूड)

बाणाचे बिंदू जोडा

'ल' बघ. 'ल' ला ○ कर.

लुगळा : आमु नवला लुगळा लेणे गोयला.

(आम्ही नवे कपडे घ्यायला गेलो.)

लोहोण : लोहोणोन भाव उतरी गोयू

(लसुणाचे भाव कमी झाले.)

लाकळो : लाकळो धोपाळतला.

(लाकूड पेटवतात.)

लावरो : आमु राती लावरा मारणे गोयला

(आम्ही रात्री लावरी मारायला गेलो.)

लाडी : लाडी रूटा वारू बोनावतली.

(नवरी भाकरी छान बनवते.)

गिरव, लिही, म्हण.

ल

ा

क+ा=(का)
काका

म+ा=(मा)
मामा

ब+ा=(बा)
बाबा (बाबू)

क+ा=(काका)
काका

प+ा=(पा)
पाटलू (पाट)

ख+ा=(खा)
खारो (मीठ)

अ+ा=(आया)आई

बाणाचे बिंदू जोडा

‘ा’ बघ. ‘ा’ कानाला ◯ कर.

मामू कामोह गोयू.
(मामा कामाला गेले.)
आमू काका हाते रोयतला.
(आम्ही काकांसोबत राहतो.)
दाओमा खारो कम से?
(दाळमध्ये मीठ कमी आहे.)
आया गीत गावतली.
(आई गाणे गाते.)
पाटलापर रूटू से.
(पाटावर भाकरी आहे.)
बाबू फिरणेह जातलू
(बाबा फिरायला जातात.)

गिरव, लिही, म्हण.

ा

इ घ र ई ि ब ी

इनखुर (इकडे)

इटळो (विट)

इ

हुइ (सुई)

फुइ (आत्या)

दुलाई (रजाई)

बाणाचे बिंदू जोडा

'इ' बघ. 'इ'ला ◯ कर.

इटळो : इटळा घर बांधणे जुवतला.

(विटा घर बांधण्यासाठी लागतात.)

दुलाइ : शेवान दाहाळामा दुलाइ पांगोरतला.

(थंडीच्या दिवसांत रजाई पांघरतात.)

हुई : गुधळो हिवणे हुई जुवतली.

(गोधळी शिवायला सुई लागते.)

इनखुर : मोहन इनखुर आव.

(मोहन इकडे ये.)

फुइ : बाबांन बोहनिसकाजे फुइ कोहतला.

(वडिलांच्या बहिणीला आत्या म्हणतात.)

गिरव, लिही, म्हण.

इ

इ इ इ इ

इ



'घ' बघ. 'घ'ला ○ कर.

घर : यो आमरो घर छे.

(हे आमचं घर आहे.)

घुळू : घुळू जुरे दौवडतलू

(घोडा जोरात धावतो.)

घुवळ : घुवळ खुब उपर उडतली.

(घार खूप वरती उडते.)

घुटण्यो : घुटण्यो मोहिव बोनावणे वापरतला.

(रवि ताक बनविण्यासाठी वापरतात.)

घाटावो : शाळा घाटावी देखाये.

(शाळा सुंदर दिसतेय.)

गिरव, लिही, म्हण.

घ

घ घ घ

र

रूखळू (राख)

रूटू (भाकर)

रिकामू (रिकामा)

रातलो (लाल)

रात (रात्र)

बाणाचे बिंदू जोडा

‘र’ बघ. ‘र’ला ○ कर.

रूटू : मी रूटू खान्यू से.
(मला भाकरी खायची आहे.)

रात : रात खुब ओय गई.
(रात्र खूप झाली.)

रातलो : टमाटो रातलो से.
(टमाटर लाल आहे.)

रिकामू : रामू रिकामू बोठ रोयूह.
(रामू रिकामा बसला आहे.)

रूखळू : रूखळू मा उडाळे.
(राख नको उडवू.)

फेटू : मारू रातलू फेटू.
(माझा रूमाल लाल आहे.)

गिरव, लिही, म्हण.

र

ई

पावरीत 'ई'चे शब्द नाहीत.

गिरव, लिही, म्हण.

ई

ई ई ई ई

ई

ि

मिरचा (मिरची)

बिलाडी (मांजर)

किचवायणे (संतापणे)

रिकामू (रिकामा)

पिणे (प्यायला)

बाणाचे बिंदू जोडा

‘ि’ बघ. ‘ि’ ला ○ कर.

बिलाडी दुध पितली.
(मांजर दूध पिते.)
ढुरे पाणी पिणे गोयला.
(गुरे पाणी प्यायला गेली.)
होयु रिकामू फिऱ्या कोरतलू.
(तो रिकामा फिरत राहतो.)
आया मारपोर किचवायतली.
(आई माझ्यावर संतापते.)
मिरची घोणी चोरकी होती.
(मिरची खूप तिखट होती.)
घर पोछो निमळू होतु.
(घरामागे कडूनिंबाचे झाड होते.)

गिरव, लिही, म्हण.

ि

ब

बुचाटो (मान)

बगल्यू (बगळा)

बोयडू (डोंगर)

बीजा (बिया)

बुकळी (बकरी)

बाणाचे बिंदू जोडा

'ब' बघ. 'ब'ला ◯ कर.

बगल्यू : बगल्यू मासा खातलू.
(बगळा मासा खातो.)

बुकळी : बुकळी चारू खातली.
(बकरी चारा खाते.)

बिजा : बिजा उरतला.
(बिया पेरतात.)

बारथे : बारथे पुऱ्या नाचतला.
(बाहेर मुले नाचतात.)

बोयडू : बोयडू निवूगार देखायेह.
(डोंगर हिरवा दिसतोय.)

बुचाटो : रामून बुचाटो दुखतलो.
(रामूची मान दुखते.)

गिरव, लिही, म्हण.

ब

ब ब ब ब

ब

पानी
(पाणी)

बारी
(झाडू)

ी

नानली
(लहान)

बुकळी
(बकरी)

बावली (बाहुली)

बाणाचे बिंदू जोडा

‘ ी’ बघ. ‘ ी’ला ○ कर.

ज्या हरी च्याहरी पानीच पानी.
(जिकडे तिकडे पाणीच पाणी.)

बारी कुंदळाम पडली से.
(झाडू कोपऱ्यात पडला आहे.)

बुकळी दूध आपतली.
(बकरी दूध देते.)

बाबू नानली बावली लावलू.
(बाबांनी लहान बाहुली आणली.)

नानली पुराय गित गावतली.
(लहान मुलगी गाणे गाते.)

गिरव, लिही, म्हण.

ी

उ न - स प ऊ त -

उखव (उखळ)

उठाळणे (उठवायला)

उ

उपोर (वरती)

उसना (उसनवार)

उजगाय (आळस)

बाणाचे बिंदू जोडा

‘उ’ बघ. ‘उ’ला ○ कर.

उखव : उखवमा कुद्री उखन्नतला

(उखळमध्ये तांदूळ कुटतात.)

उठाळणे : मे साहिलकाजे उठाळणे गोयलु

(मी साहिलला उठवायला गेलो.)

उजगाय : रमेश कामोन उजगाय कोरतलू.

(रमेश कामाचा आळसपणा करतो.)

उपोर : झाडोपोर चिल्ला बोठतला.

(झाडावर पक्षी बसतात.)

उसना : उसना लेदला पौयश्या वापीस कोर देनू

(उसनवार घेतलेले पैसे परत करून देणे.)

गिरव, लिही, म्हण.

उ

उ उ उ उ

उ



‘ ु ’ बघ. ‘ ु ’ ला ◯ कर.

मुकायून रूटू हाजू लागतलू.

(मक्याची भाकर चांगली लागते.)

बुकळू मोर गोयलू.

(बोकड मरून गेला.)

थुळू होरकिन बोठ.

(थोडं सरकून बस.)

पूनम हुव गोयली.

(पूनम झोपली.)

कुकळी पांझरामा बोठी.

(कोंबडी खुराड्यात बसली.)

गिरव, लिही, म्हण.

ु

न

नाक (नाक)

नानली (लहान)

नवलो (नव)

निंबावी (लिंबू)

नावटू (न्हावी)

बाणाचे बिंदू जोडा

‘न’ बघ. ‘न’ ला ○ कर.

नानली : मारजू नानली बावली छे.

(माझ्याजवळ लहान बाहुली आहे.)

नाक : नाकुवाटे दोम लेतला.

(नाकाद्वारे श्वास घेतात.)

नावटू : नावटू झुटा काटतलु.

(न्हावी केस कापतो.)

निंबावो : निंबावो खाटो लागतलो.

(लिंबु आंबट लागतो.)

गिरव, लिही, म्हण.

न



‘स’ बघ. ‘स’ला ◯ कर.

सुपळो : दाणा चुखावणे सुपळो जुवतलो.

(धान्य साफ करायला सूप लागते.)

सामने : शाळान सामने दुकान छे.

(शाळेसमोर दुकान आहे.)

सोजाळीन: नवली गाडी सोजाळीन लावला.

(नवी गाडी सजवून आणली.)

सायकल : मेसेक सायकल गवतली.

(मला सायकल आवडते.)

सखर : सखर गुवो लागतलो.

(साखर गोड लागते.)

गिरव, लिही, म्हण.

स

स स स स

स



‘प’ बघ. ‘प’ला ◯ कर.

पानटो : झाडोन पानटो आलेह.
(झाडाचं पान हलतेय.)
पंखु : पंखु जुरमा फिरतलु.
(पंखा जोराने फिरतो.)
पांजरू : पांजरामा पिला से.
(घरट्यात पिल्लू आहे.)
पुऱ्या : पुऱ्या शाळामा जातला.
(मुले शाळेत जातात.)
पुस्तक : बाबू नवला पुस्तके लाव्यू.
(बाबांनी नवी पुस्तके आणली.)
पतंग : पतंग उडाळणेह चालू.
(पतंग उडवायला चला.)

गिरव, लिही, म्हण.

प

प प प प

प

ऊ

पावरीत 'ऊ'चे शब्द नाहीत.

गिरव, लिही, म्हण.

ऊ

ऊ ऊ ऊ ऊ

ऊ



'त' बघ. 'त' ला ◯ कर.

ताकळो : दुकानोमा मुजने ताकळो रोहतलो.

(दुकानात मोजण्यासाठी (मापण्यासाठी) तराजू राहतो.)

मायता : आखा पुऱ्या मायता बोठ रोहला.

(सर्व मुलं आत बसलेली होती.)

तातो : तातलो खाणो खाणू

(गरम अन्न खावं.)

तऊ : तातला तऊकाजे हात नी लागळनू.

(गरम तव्याला हात लावू नये.)

तलवार : आमचे घर तलवार छे.

(आमच्या घरी तलवार आहे.)

गिरव, लिही, म्हण.

त

त त त त

त

ृ

पावरीत ' ृ 'चे शब्द नाहीत.

गिरव, लिही, म्हण.

ृ

ए च ळ ह झ

एक रूप्यू
(एक रुपया)

एखलू
(एकटा)

ए

एकुच
(एकच)

एने
(आणि)

बाणाचे बिंदू जोडा

'ए' बघ. 'ए' ला ○ कर.

एखलू : राती एखलू अभ्यास कोरजी.
(रात्री एकटा अभ्यास करायचा.)

एकूच : एकूच आंबान झाड लावजी.
(एकच आंब्याचं रोप आण.)

एक रूप्यू : एकरूप्यानं चॉकलेट लेदला.
(एक रुपयाची चॉकलेट घेतली.)

एने : आमु रूटू एने दाव खायीन आवला.
(आम्ही पोळी आणि दाळ खाऊन आलोय.)

गिरव, लिही, म्हण.

ए

ए ए ए ए

ए



'च' बघ. 'च' ला ○ कर.

चमचो : चमचो ऊरू लाव.

(चमचा इकडे आण.)

चुर : चुर चुरी कोरतलू.

(चोर चोरी करतो.)

चारू : वासळाह चारू घाल.

(वासरूला चारा घाल.)

चाकटो : गाडान चाकटो मुडाय गोयों.

(बैलगाडीचं चाक मोडलं.)

चरको : दाल चरकी से.

(दाळ तिखट आहे.)

चाविन : खाणो चाविन चाविन खा.

(जेवण चावून चावून खा.)

गिरव, लिही, म्हण.

च

च च च च

च



'ख' बघ. 'ळ' ला ◯ कर.

दगळू : दगळाननेचे विसू होतू.
(दगडाखाली विंचू होता.)

लागाळ : राती झुपलू लागाळीन सुनू.
(रात्री दरवाजा लावून झोपणे.)

गोळहू : खेतोमा मोटलू गोळहू होतू.
(शेतात मोठा साप होता.)

वातळो : रूटू वातळू होतू.
(भाकरी कडक होती.)

रुखळू : लाकळा धोपधोपीन रुखळ होयगोयला.
(लाकडाची जळून राख झाली.)

गिरव, लिही, म्हण.

ळ

ह

हुवणे (झोपणे)

वाहवू (हवा)

हेवो (थंड)

हाकवे (अंडे)

हासलिन (खरंच)

बाणाचे बिंदू जोडा

‘ह’ बघ. ‘ह’ ला ○ कर.

हासलिन : हासलिन मी अभ्यास करलू.

(खरंच, मी अभ्यास केला.)

वाहवू : आज खुब वाहवू से.

(कुत्रा भाकरीचा वास घेऊ लागला.)

हेवो : आज खुब हेवो से.

(आज खूप थंडी आहे.)

हुवणे : पुऱ्या हुवणे गोया.

(मुले झोपायला गेली.)

गिरव, लिही, म्हण.

ह

ह ह ह ह

ह



'झ' बघ. 'झ' ला ○ कर.

झेपणे : आखा पुऱ्या नदीपोर झेपणे गोयला.
(सर्व मुलं नदीत पोहायला गेलेत.)
झेलणे : रमेश गुंडू झेलणे दौवळ्यु.
(रमेश चेंडू पकडायला पळाला.)
झोगळू : रमेश एने सुरेश झोगळायला होता.
(रमेश आणि सुरेश भांडण करत होते.)
झोपळू : झोपळून बारथे चाट्या निकावणू.
(दरवाजाबाहेर चप्पल काढणे.)
झुटा : झुटा दाहळीन विचरणू.
(केस रोज विंचरणे.)

गिरव, लिही, म्हण.

झ

झ झ झ झ

झ

द ड व ग ऐ ै

द

दोर (बिळ)

दवा (औषधी)

दगळू (दगड)

देख (बघ)

दवाखाना (दवाखाना)

बाणाचे बिंदू जोडा

'द' बघ. 'द' ला ○ कर.

दवा : मेडिकलपोर दवा जोडतली.

(मेडिकलवर औषधे मिळतात.)

देख : सतीश टिव्ही देखतू होतू.

(सतीश टिव्ही बघत होता.)

दवाखाना : मांदलाणूक दवाखानामा लिजातला.

(आजारींना दवाखान्यात घेऊन जातात.)

दगळू : दोगळान बंधारू बांधतला.

(दगडांचा बंधारा बांधतात.)

दोर : उंदरू दोरोमा भोराय गोयू.

(उंदीर बिळात गेला.)

गिरव, लिही, म्हण.

द

द द द द

द



‘ड’ बघ. ‘ड’ ला ○ कर.

डबो : डबो धुव लावा.

(डबा धुवून आणला.)

डाबरो : डाबरामा मासा सेताह.

(डबक्यात मासे आहेत.)

डुकरू : डुकरू नाचणे लाग्यू.

(म्हातारा नाचायला लागला.)

डाव : डावोपोर चिडा बोठ रोयाहा.

(फांदीवर पक्षी बसले आहेत.)

डाखऱ्यु : शरद डाखऱ्यु से.

(शरद डावखुरा आहे.)

गिरव, लिही, म्हण.



वेलू
(वेल)

वादवो
(ढग)

व

वाणे
(उद्या)

वाकलो (वाकलेला)

वाहवू
(हवा)

बाणाचे बिंदू जोडा

'व' बघ. 'व' ला ◯ कर.

वादवो : वादवो भोराय आव्यो.
(ढग भरून आले.)

वाहवू : वाहवू जुरमा वयतलू.
(वारा जोराने वाहतो.)

वाकलो : झाड वाकलो से.
(झाड वाकलेलं आहे.)

वाणे : वाणे घर जाणू से.
(उद्या घरी जायचं आहे.)

वेलू : घरोहाते गिलकान वेलू से.
(घराजवळ गिलक्याची वेल आहे.)

गिरव, लिही, म्हण.

व

व व व व

व



'ग' बघ. 'ग' ला ◯ कर.

गावळी : गावळी दुध आपतली.

(गाय दूध देते.)

गाव : आमु मामानं गाव फिरणे जातला.

(आम्ही मामाच्या गावाला फिरायला जातोय.)

गुदळो : आया गुदळो हिवतली.

(आई घोंगडी शिवते.)

गोदळो : कुमायळू गोदळो पावतलु.

(कुंभार गाढव पाळतो.)

गुवो : साखर गुवो छे

(साखर गोड आहे.)

गिरव, लिही, म्हण.

ग

ग ग ग ग

ग

ऐ

पावरीत 'ऐ' हा शब्द नाही.

गिरव, लिही, म्हण.

ऐ

ऐ ऐ ऐ ऐ

ऐ

ै

पावरीत ‘ ै ’ हा शब्द नाही.

गिरव, लिही, म्हण.

ै ै ै ै

ै

ै



‘ध’ बघ. ‘ध’ ला ◯ कर.

धुवू : आमरा खेतोमा कावू धुवू छे.

(आमच्या शेतात काळी माती आहे.)

धुवणे : मार आया लुगळा धुतली.

(माझी आई कपडे धुते.)

धोर : गावळी वारू धोर.

(गाय नीट पकड.)

धाक : मेसेक कुत्रान धाक पोडतली.

(मला कुत्र्याची भिती वाटते.)

दुध : मी दाहळीन दुध पितलू.

(मी रोज दुध पितो.)

गिरव, लिही, म्हण.

ध

ध ध ध ध

ध



'य' बघ. 'य' ला ◯ कर.

आया : मार आया खुब हाजी से.

(माझी आई खूप चांगली आहे.)

सायकल : मारी नवली सायकल से.

(माझी नवी सायकल आहे.)

मुकाय : मुकाय दोववणे जा.

(मका दळायला जा.)

गोया : आखा पुऱ्या घर गोया.

(सर्व मुले घरी गेली.)

पाय : मार पाय दुखेह.

(माझा पाय दुखतोय.)

गिरव, लिही, म्हण.

य

य य य य

य



'फ' बघ. 'फ' ला ◯ कर.

फुगू : मेसेक लाल फुगू गवतलू.

(मला लाल फुगा आवडतो.)

फुवू : फुइन घोखालाक फुवू कोहतला.

(आत्याच्या नवऱ्याला आतेमामा म्हणतात.)

फुगलू : फुगू फुगलू होतू.

(फुगा फुगलेला होता.)

फोम : मेसेक आया-बाबांन फोम आवे.

(मला आई-बाबांची आठवण येत आहे.)

फावू : वर्गामा फावू टुवू कोरला.

(वर्गात वर्गणी गोळा केली.)

गिरव, लिही, म्हण.





‘ओ’ बघ. ‘ओ’ ला ◯ कर.

ओवी : दोंगव्या ओवी लियावजी.

(कांदे अजून घेऊन यायचे.)

ओखात्री : ओखात्रीपोर पुड्यारूटा रांदतला.

(अक्षयतृतीयाला पुरणपोळी बनवतात.)

ओगली : ओगली गाडीमा जासू.

(पुढच्या गाडीने जावू.)

ओडीक : मार ओडीक देखायती होती.

(माझ्या ऐवढी दिसत होती.)

ओगो : मार ओगो राहुल बोसतलू.

(माझ्यापुढे राहुल बसतो.)

गिरव, लिही, म्हण.

ओ

ओ ओ ओ ओ

ओ



'ज' बघ. 'ज' ला ◯ कर.

जहाज : जहाजोमा माणहे बोठ्या.

(जहाजात माणसे बसली.)

जामने : जामणे खाटा से.

(जांभूळ खट्टे आहेत.)

जामफोव : जामफोव काचला से.

(पेरू कच्चे आहेत.)

वाजे : ढुल जुरमा वाजे.

(ढोल जोरात वाजतो.)

जात्रा : जात्रा देखणे चालू.

(यात्रा बघायला चला.)

गिरव, लिही, म्हण.

ज

सुश्यो
(अपेक्षा)

शेगवा
(शेवगा)

श

सेशल्यो
(ससा)

शेकणे
(शेकणे)

बाणाचे बिंदू जोडा

'श' बघ. 'श' ला ○ कर.

शेगवा : मेसेक शेगवान भाजी वारू लागतली.

(मला शेवग्याची भाजी आवडते.)

शेकणे : माछा तवापोर शेकीण आप.

(मासे तव्यावर शेकून दे.)

सेशल्यो : सेशल्यो बोयळामा रोहतला.

(ससा जंगलात राहतो.)

गिरव, लिही, म्हण.

श

श श श श

श



'ो' बघ. 'ो' ला ◯ कर.

खोवी : खोवी दाळीन बारनु जुवे

(अंगण रोज झाडले पाहिजे.)

थोयलू : थोयलू भोरीन भाजीपालू लावलू.

(पिशवी भरून भाजीपाला आणला.)

डोगलो : मारो नवलो डोगलो से.

(माझा नवीन सदरा आहे.)

मोह : गालोपर मोह से.

(गालावर मस आहे.)

भोयळू : भोयळू (निवाण) देखायेह.

(डोंगर हिरवागार दिसतोय.)

गिरव, लिही, म्हण.

ो

ण ख थ औ भ

ण

पावरीत 'ण' हा शब्द नाही.

गिरव, लिही, म्हण.

ण

खाड्डू
(खड्डा)

खुपरो
(खोबरं)

ख

खाटलू
(खाट)

खुद्रु (नदी)

खराटू
(खराटा)
बाणाचे बिंदू जोडा

'ख' बघ. 'ख' ला ○ कर.

खुपरो : प्रसादमा खुपरो आपला.
(प्रसाद म्हणून खोबरे दिले.)

खराटू : ढुरवाडामा खराटू छे.
(गोठ्यात खराटा आहे.)

खुद्रु : गावसाथे खुद्रु छे.
(गावाजवळ नदी आहे.)

खाटलू : खाटलू लाकडान बोनावतला.
(खाट लाकडाची बनवतात.)

खाड्डू : खांबू गाळने खाड्डू खुंदला.
(खांब गाडण्यासाठी खड्डा खोदला.)

गिरव, लिही, म्हण.

ख



'थ' बघ. 'थ' ला ○ कर.

थैलू : थैलू भोरीन बाजार लावला.

(पिशवी भरून बाजार आणला.)

थावी : खायलीन थावी धुवीन मेकणू.

(जेवण झाल्यावर ताट धुवून ठेवणे.)

मेथी : मेसेक मेथीन भाजी गवतली.

(मला मेथीची भाजी आवडते.)

थाकलू : दहाडक्या काम कोरीन थाकगोया.

(मजूर काम करून थकले.)

थुपणे : ज्या-च्या नि थुपणू.

(जिथं-तिथं थुंकू नये.)

गिरव, लिही, म्हण.

थ

थ थ थ थ

थ

औ

पावरीत 'औ' हा शब्द नाही.

गिरव, लिही, म्हण.

औ

औ औ औ औ

औ



'भ' बघ. 'भ' ला ◯ कर.

भेंडा : आया आज भेंडा रांदली.

(आईने आज भेंडी बनवली.)

भातभातीन : फुले भातभातीन रोहतला.

(फुले वेगवेगळ्या प्रकारची असतात.)

भुक : रोहनकाजे जुरे भुक लाग रोहली.

(रोहनला जोरात भुक लागली होती.)

भुवू : बोहणीशोन घोरवालाक भुवू कोहतला.

(बहिणीच्या नवऱ्याला /पतीला पाहुणा म्हणतात.)

भावणे : आखा पुऱ्या मारभुनी भावता होता.

(सर्व मुलं माझ्याकडे बघत होती.)

गिरव, लिही, म्हण.





‘ ौ ’ बघ. ‘ ौ ’ ला ◯ कर.

दौवळीन : शाळामा दौवळीन जा.

(शाळेत धावत जा.)

चौवा : चौवान दाव बनावली से.

(चवळीची दाळ बनवली आहे.)

कौला : मारो घर कौलान से.

(माझं घर कौलारू आहे.)

गिरव, लिही, म्हण.



ट ढ ठ छ ष

वाटकी (वाटी)

टमाटर (टमाटर)

ट

पेटी (पेटी)

टरबुज्यो (टरबुज)

वटाणा (वाटाणा)

बाणाचे बिंदू जोडा

‘ट’ बघ. ‘ट’ ला ○ कर.

टमाटर : टमाटर रातला रोहतला.

(टमाटर लाल रंगाचे असतात.)

टरबुज्यो : टरबुज्यो उनावामा आवतला.

(टरबुज उन्हाळ्यात येतात.)

वटाणा : वटाणा खाणे वारू रोहतला.

(वाटाणे खायला चांगले असतात.)

पेटी : पुन्या पेटीलीन शाळामा आवतला.

(मुले पेटी घेऊन शाळेत येतात.)

वाटकी : वाटकी भोरीन खीर खाय गोयलू.

(वाटी भरून खीर खाऊन गेला.)

गिरव, लिही, म्हण.

ट



'ढ' बघ. 'ढ' ला ○ कर.

ढुरे : ढुरे चारणे जंगलोम जा.

(जनावरे चारायला जंगलात जा.)

ढुल : श्याम ढुल वाजाळतलू.

(श्याम ढोल वाजवतो.)

ढुरवाडो : ढुरवाडो साफ से.

(गोठा साफ आहे.)

ढेरका : ढेरका पुऱ्या शाळामा आवतला.

(जास्त मुले शाळेत येतात.)

ढुंगूवोव : ढुंगूवोविन काम कोर.

(खाली वाकून काम कर.)

गिरव, लिही, म्हण.

ढ

बोठ
(बस)

उमठू
(अंगठा)

ठ

ठावकू
(शांत)

ठोगणे (खोटं बोलणे)

ठसू
(ठसा)
बाणाचे बिंदू जोडा

'ठ' बघ. 'ठ' ला ◯ कर.

उमठू : मारू उमठू दुखाये.
(माझा अंगठा दुखतोय.)

ठसू : पुवापोर बुलोन डीलोपोर ठसू उमटाळला.
(पोळ्यामध्ये बैलांच्या शरीरावर ठसे उमटवले.)

ठोगणे : ठोगणेन वारू वात नी होय.
(खोटं बोलणे योग्य नाही.)

ठावकू : सर आवता पुऱ्या ठावका बोठ गोया.
(सर येताच मुले शांत बसली.)

गिरव, लिही, म्हण.

ठ



‘छ’ बघ. ‘छ’ ला ○ कर.

छाती : छातीमा दुखतलो.

(छातीत दुखते.)

छतरी : मारी छतरी फाट गोयली.

(माझी छत्री फाटली.)

छाप : वियावोन पत्रिका छापणू से.

(लग्नपत्रिका छापायची आहे.)

गिरव, लिही, म्हण.



ष

पावरीत ‘ष’ हा शब्द नाही.

गिरव, लिही, म्हण.

ष

कविता गाणे



अग्गोबाईऽऽ ढग्गोबाईऽऽ

- चित्र बघ. काय, काय दिसत ते सांगा. (शिक्षकांसाठी)
- पाठातील चित्राचे निरीक्षण करायला सांगा. त्यावर प्रश्न विचारा.
- आभाळाचा रंग कसा आहे? आभाळातून काय पडत आहे?
- पाणी कुठून वाहत आहे? पाण्यात काय काय दिसते?
- गवताचा रंग कुठला? गवताचा उपयोग सांगा बरं?

कवितेचा पाठ घ्यावा.

- शब्दांच्या जोड्या - विद्यार्थ्यांना मोठ्याने घोकायला सांगा.

- अग्गोबाई- ढग्गोबाई
- लागली कळ - केवढी झळ
- लागली फार - पाण्याची धार
- उघडून दार - बडबड फार

नादानुकारी शब्द
ऐका... मोठ्याने म्हणा.

- वारा गरा गरा　　सो सो सूम
  ढुम ढुम ढुम　　चम चम छडी

बीज

(शिक्षकांसाठी)

◆ **प्रत्यक्ष बिया दाखवा -**
उदा. गहू, तांदूळ (धान), ज्वारी, नाचणी, रानातील बिया.

◆ **मुलांना हाताळू द्या.**

◆ विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी कुठल्या बिया आहेत, हे विचारा. बियांची नावं त्यांना मोठ्याने सांगायला प्रोत्साहित करा.

◆ **कविता (मोठ्याने म्हणा)**

◆ **जोडीचे शब्द :** विद्यार्थ्यांना मोठ्यानं ठेक्यावर उच्चारायला सांगा.
जसे, रुजतं - निजतं - भिजतं
झुलता - झुलता
झाड होईल छान, बहरेल रान

◆ **कृती :**

◆ कोंब दाखवा.

◆ कोंबाचे मित्र कोण? दाखवा, म्हणा, पाणी, सूर्य इ.

◆ बी - रोप - झाड - फांद्या - पान - फुलं - फळ, चित्र आणि प्रत्यक्ष दाखवा. हाताळताना मोठ्याने म्हणायला सांगा.

आई, मला दे ना!

१. तुमूक काय जुवे ती कुदाजूव मागतला?
(तुम्हाला काही पाहिजे असेल तर कोणाकडे मागता?)
२. मोटा होईन तुमू काय बनण्या से?
(मोठ होऊन तुम्हाला काय बनायचं आहे?)
३. तुमरेजूव काय काय खेलने से?
(तुमच्याकडे कोण कोणती खेळणी आहेत?)
४. मोठा व्हइन काय बनशी?
(मोठा झाल्यावर काय बनशील?)

आई, मला देना', या धर्तीवर फळ, फुल, पुस्तक, दफ्तर इ. परिचयाच्या वस्तू घेऊन विद्यार्थ्यांना वर्गात कृती करायला सांगा.


आई, मला छोटीशी बंदूक दे ना !
बंदूक घेईन । शिपाई होईन ।
ऐटीत चालीन । एक दोन तीन ।।१।।

आई, मला छोटीशी मोटार दे ना !
मोटार घेईन । ड्रायव्हर होईन ।
गावाला जाईन । पों पों पों ।।३।।

आई, मला छोटेसे विमान दे ना !
विमान घेईन । पायलट होईन ।
आकाशी जाईन । भर भर भर ।।४।।

आई, मला छोटीशी बाहुली दे ना !
बाहुली घेईन । तिजला मी सजवेन
ती संगे नाचेन । छुम छुम छुम ।।५।।

माझा घोडा

१. राजु कायतापोर बोठीन फिरतलू?
(राजा कशावर बसून फिरतो?)
२. तुमू घुडापोर बोठ रोया काय?
(तुम्ही घोड्यावर बसले आहात काय?)
३. घुडू कुण-कुण देखरोया?
(घोडा कोणी कोणी बघितला?)
४. घुडू कोसू दौवळतलू?
(घोडा कसा धावतो?)

शब्द :
तोडा - तुडू
कान - कानटो
मान - बुचाटो
पाठ - वास
चाबुक - चबकळू

जोडीचे शब्द विद्यार्थ्यांना मोठ्याने कृती करत म्हणायला सांगा.
जसे. टपटप टपटप...
दुडकत दुडकत
थोडा थोडा
माझा घोडा, आधी रस्ता सोडा.

असे कसे? (ओसो-कोसो?)

१. राती वादवामा काय देखायतला?
(रात्री आकाशात काय दिसते?)
२. आखागोथा घाटावा पिसळा कुणीन रोहतला?
(सर्वांत सुंदर पिसे कोणाची असतात?)
३. मासा का रोहतला?
(मासे कोठे राहतात?)
४. तुमरा घोरोमा कुण गवतलो?
(तुम्हाला घरात कोण आवडते?)

विद्यार्थ्यांना, असे कसे? असे कसे? या धर्तीवर प्रश्न विचारा आणि सामुहिक उत्तरे मोठ्याने द्यायला प्रोत्साहित करा.

जसे,
असे कसे? असे कसे? झाडे रात्री झोपती कुठे?
असे कसे? असे कसे? आजोबांचे केस पांढरे कसे?

जाडलू बाबू (लोठेबाबा)

चित्राचे बारकाईने निरिक्षण करायला सांगणे? प्रश्न-उत्तरात चित्र वाचन करणे.

१. तूमू जाडला माणहो देखला काय?
(तुम्ही जाड्या माणसाला बघितले काय?)
२. माणहे जाडा काहा ओयतला?
(माणसे जाडे का होतात?)
३. तुमू घर काय काय खातला?
(तुम्ही घरी काय काय खाता?)

गाडी आवी गाडी आवी (गाडी आली.. गाडी आली)

१. तुमू काणला काणला गाड्या देखरोया?
(तुम्ही कोण कोणत्या गाडी बघितलेल्या आहेत?)
२. रेल्वेमा कुण-कुण बोठ रोयो?
(रेल्वेत कोण कोण बसलंय?)
३. तुमू काणला-काणला फव देखरोया?
(तुम्ही कोण-कोणते फळ बघितले?)

वर्गात हा खेळ खेळणे.



वेड कोकरु

१. तुमू मेढान नामलो बच्यो देखला काय?
(तुम्ही मेंढीचे पिल्लू पाहिले काय?)
२. मेढान झुटा कोहला रोयतला?
(मेंढीचे केस कसे असतात?)
३. तुमरा गावमा मेंढा सेताह काय?
(तुमच्या गावात मेंढी आहेत का?)

चित्र दाखवा
कवितेला सुरुवात करा.

मुलांना त्यांच्या पाड्यावरील बकरीच्या पिल्लांचे वर्णन करायला सांगणे.

जंगलात ठरली मैफल



१. जंगलमायला जनावरोन नावे कोयू?
(जंगलातल्या प्राण्यांची नावे सांगा.)
२. जंगलमायला काणला जनावरे तुमू देखरोया?
(तुम्ही कोणकोणते जंगली प्राणी बघितले आहेत?)
३. भात-भातीन जनावरोन आवाज निकावू.
(वेगवेगळ्या प्राण्यांचे आवाज काढा.)

जंगली प्राणी आणि पाळीव प्राणी यातील फरक मुलांना समजावून सांगा.

कथा आणि वाचन पाठ

पाऊस

(शिक्षकांकरिता)

◆ गोष्ट मोठ्याने वाचून दाखवावी. 'दिनू'च्या ऐवजी वर्गातील विद्यार्थ्यांची नावं द्यावीत.

◆ गोष्टी आधी, पावसाची आठवण ताजी करावी किंवा पाऊस पडत असतानाच पाठ घ्यावा.

◆ पावसाबद्दल प्रश्न विचारावे. जसे, पाऊस कुणी-कुणी बघितला? कोण-कोण पावसात भिजलं? पाऊस कुठून पडतो? इ.

पाठ घ्यावा.

◆ महत्त्वाचे शब्द - वदवून घ्यावेत.

पाऊस, काळे ढग, आकाश, थेंब, खूप ऊन, पाण्याची वाफ, ढगाला गारगार वारा.

काही प्रश्न - तोंडी माहिती

◆ पाण्याची वाफ कशामुळे होते?

◆ वाफेचे काय होते?

◆ ढग कुठे जमा होतात?

◆ ढग आपल्याला काय देतात?

◆ पाऊस पडल्यावर गावाकडे आई-बाबा कुठे जातात?

चित्र काढ.

वरील प्रश्न, गप्पा-गोष्टी, तोंडी माहिती यावर आधारित मुलांना चित्र काढण्यास प्रोत्साहित करावे.

वाचनपाठ

(शिक्षकांसाठी)

◆ वाचनपाठ मोठ्याने वाचा. शिक्षकांनी एक वाक्य वाचावे, विद्यार्थ्यांनी त्याची उजळणी करावी, जसे. 'काका घरी आला.'

◆ अशीच कृती गटात करावी. एका गटाने एक वाक्य मोठ्याने वाचावे, दुसऱ्या गटाने त्याची उजळणी करावी. आलटून पालटून ही कृती करावी.

वाचनपाठ १.

- पाठातील मुलाला नाव द्या. (स्थानिक द्यावे)

◆ मोठ्याने वाचा, तोंडी उत्तरे विचारा.

◆ मुलाच्या घरी कोण-कोण आले? (चित्र बघा.)

- काका, काकी, मामा, मामी. याचप्रमाणे इतर नाती विचारा. जसे, आत्या, आतोबा, आजी, आजोबा.

◆ **इरा कोण आहे?** (चुलत बहीण)

- विद्यार्थ्यांना त्यांच्या चुलत भावंडांची नावं विचारा.

◆ **रिमा कोण आहे?** (मामे बहिण)

- विद्यार्थ्यांना त्यांच्या मामे भावंडांची नावं विचारा.

◆ **मुलगा व रिमाचे नाते काय?**

◆ विद्यार्थ्यांकडून नाते स्पष्ट करा. जसे,

- आईचा भाऊ - **मामा**
- आईची बहिण - **मावशी**
- वडिलांचा भाऊ - **काका**
- वडिलांची बहिण - **आत्या**

बोलीभाषेत काय म्हणतात, त्याचा मेळ घालावा.

◆ वाचनपाठ २, ३ आणि ४ कृतीनिष्ठ आहेत. पाठ्यपुस्तकातील पाठांवर विद्यार्थ्यांकडून गटात कृती करून घ्यावी. जसे,

-लता सरबत पी.

- चेतन चहा कर.

वाचनपाठ २.

गोलातील शब्दांच्या जोड्या करून वाक्य तयार करणे. गटांमध्ये असा खेळ घ्यावा.

◆ वर्गातील मुला-मुलींची नावं आणि वसतीगृह व शाळा यातील काम आणि वस्तू घेऊन गोल बनवावे व विद्यार्थ्यांना अर्थपूर्ण वाक्य तयार करण्यास प्रोत्साहित करावे.

वाचनपाठ ३.

◆ चित्राच्या जागी नेमका शब्द वापरून वाक्य तयार करायचे व ते मोठ्या आवाजात विद्यार्थ्यांकडून वदवून घ्यायचे.
जसे, गावाजवळ ओढा होता.
मासे फार चपळ होते.

◆ याचप्रकारे विद्यार्थ्यांना आपल्या वसतीगृह आणि शाळेबाबत वाक्य तयार करावयास सांगावे.
जसे, आमच्या शाळेजवळ रस्ता आहे.
आमच्या वसतीगृहाजवळ फुलांचे झाड आहेत.

वाचनपाठ ४.

◆ पाठ मोठ्याने वाचावा.
◆ पाठाच्या आधारावर एका-एका वाक्यात विद्यार्थ्यांना आपल्या गावाचे, पाड्याचे किंवा टोल्याचे वर्णन करण्यास प्रोत्साहित करावे.

माझा भारत

(शिक्षकांसाठी)

- राष्ट्रध्वजाची माहिती सांगणे.
- १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवसांचं महत्त्व आणि विशेष सांगणे.
- शाळेत झालेल्या कार्यक्रमांची आठवण ताजी करणे.
- याचबरोबर आपल्या देशाची सर्वसाधारण भौगोलिक माहिती देणे.
- समुद्र कुठे आणि त्यांची नावं.

  उदा. मुंबई- अरबी समुद्र, कलकत्ता- बंगालचा उपसागर इ.
- पर्वत

  उदा. सह्याद्री, सातपुडा, हिमालय इ.
- प्रमुख नद्या
- शिवाय पाठातील प्रश्न.
- क्विझ किंवा सांगा बरं! असा वर्गात खेळ घ्यावा.

कार्यपुस्तिका

मराठी

बालभारती

वर्ग पहिला

बोलीभाषा भिल वसावे

केवळ आदिवासी आश्रमशाळांमध्ये मर्यादित वितरणासाठी

मराठी

बालभारती

वर्ग पहिला

कार्यपुस्तिका - बोलीभाषा : भिल वसावे

बोलीभाषा अनुवाद प्रकल्प,
आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे.

अनुवाद प्रकल्प समिती

अध्यक्ष : डॉ. किरण कुलकर्णी

आयुक्त, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे.

कार्यगट : कल्पना सोनवणे, प्रकाश वसावे,
संभाजी वळवी, रूपसिंग वळवी

कार्यपुस्तिका : अनुवाद व लेखन - प्रकाश वसावे

चित्र : दिपक संकपाळ

मांडणी : मिलिंद जोशी, मंगला घरडे, मेघा चवले

संकल्पना व संयोजन : मितानीन फाउंडेशन, पुणे

कार्यपुस्तिका समजून घेतांना...

आवाहन

महाराष्ट्राच्या दुर्गम भागात राहणाऱ्या आणि आश्रमशाळेत शिकणाऱ्या पहिल्या वर्गाच्या आदिवासी मुला-मुलींसाठी पहिलीच्या बालभारती मराठीच्या पाठ्यपुस्तकाचा त्या त्या बोलीभाषेत अनुवाद करण्याचा उपक्रम आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबवण्यात आला आहे. बोलीभाषेत अनुवाद केलेल्या पाठ्यपुस्तकाचा शिक्षकांनी कसा वापर करावा याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आश्रमशाळेतील शिक्षकांनीच प्रायोगिक तत्त्वावर (आणि खासगी वितरणासाठी) या कार्यपुस्तिका तयार केल्या आहेत. यात इतर शिक्षकांकडूनही अधिक सुधारणा, दुरुस्त्या, वर्गशिक्षणाच्या नव्या कल्पना अपेक्षित आहेत. अशा सूचनांचे आम्ही सहर्ष स्वागत करतो.
विभिन्न बोलीभाषा बोलणाऱ्या आदिवासी मुला-मुलींचा मराठी भाषेशी मैत्रीचा सांधा जुळावा आणि त्यांचे मराठीमधील पुढील शिक्षण सुगम व्हावे म्हणून हा प्रयत्न. हा प्रयत्न अधिक प्रशस्त आणि प्रभावी व्हावा यासाठी आवाहन.

अनुवाद प्रकल्प समिती
अध्यक्ष : डॉ. किरण कुलकर्णी
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

कार्यपुस्तिका तयार करताना काही प्रमुख बाबींवर अधिक जोर देण्यात आला. त्या पुढीलप्रमाणे. शिक्षकांनी कार्यपुस्तिका सुरू करण्यापूर्वी या बाबी अवश्य लक्षात घ्याव्यात.

- ☞ बोलीभाषेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मराठीची समज रुजविणे हा कार्यपुस्तिकेचा मुख्य उद्देश.
- ☞ कार्यपुस्तिका, ४ भागात विभागली आहे. १) चित्रकथा २) अक्षर ओळख ३) कविता व गाणी ४) कथा-वाचन पाठ.
- ☞ 'माझे पान' आणि 'वाचन व लेखनपूर्व तयारी' यावर विशेष भर आहे.
- ☞ 'अक्षर-ओळख' ही भाषा आत्मसात करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असते. अक्षरांकडून शब्दांकडे नेणे, अक्षरांचे दृढीकरण करणे व त्यानंतर त्या अक्षरांपासून तयार होणाऱ्या शब्दांचा वाक्यात उपयोग करून सराव करून घेणे, आणि याद्वारे वाचन व लेखन प्रक्रिया पुढे नेणे. यासाठी

बोलीभाषेतील शब्दांची मदत घेण्यात आली आहे.

☞ अक्षर-ओळख, त्यातून शब्द पाहणे, शब्द ऐकणे, शब्द बोलणे, शब्द वाचणे, शब्द लिहिणे, अर्थ समजणे, शब्द अन् वस्तू, याचा संबंध जोडणे तसे शब्द-वाक्य यातून कल्पना उमजणे या सर्व प्रक्रियांसाठी बोलीभाषेची मदत घेण्यात आली आहे.

☞ आपल्या भाषेत बोलण्याचे, चर्चा करण्याची, तसेच प्रश्न विचारण्याची मोकळिक विद्यार्थ्यांना मराठीशी सलगी करण्यात मदत करेल.

☞ चित्रकथा बघून वाचण्याची, त्यावर चर्चा करण्याची, आपल्या गावातील, पाड्या किंवा टोल्यावरील स्थितीशी तुलना आणि सारखेपणा शोधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी. उदा. चित्रामधील खेळ आणि मुल आपल्या घरी खेळत असलेले खेळ, यांच्या संबंधातून 'खेळ' ही कल्पना स्पष्ट होईल.

☞ चित्रांचे बारकाईने निरीक्षण करणे, बघितलेल्या, ऐकलेल्या गोष्टींची चित्रं, रेखाटन जसे असतील तसे उतरविणे व त्यावर गटात चर्चा करणे. (सुरुवातीला बोलीभाषेत अशा चर्चा होतील.) अशी संधी विद्यार्थ्यांना मिळावी. याद्वारे ते बोलते होतील.

☞ कविता, गाणी, कथा यातील शब्दांच्या गंमती किंवा शब्द-जोडीतील ठेका, 'ध्वनी' मधली विविधता या सर्वांचा विद्यार्थ्यांना अनुभव घेता यावा अशी संधी देणे.
उदा. निजल-रूजल, भिंगरी-झिंगळी, लोट्ठेबाबा-पोटेबाबा.

☞ प्राणी, पशु-पक्षी यांचे ध्वनी काढण्यास तसेच त्यांची घरटी तयार करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे. याद्वारे त्यांचे वर्ग शिक्षणात समायोजन लवकर होऊ शकेल.

☞ अक्षर-शब्द-वस्तु याचा संबंध दृढ करण्यासाठी विविध कृती, जसे, सावली-झाडाची, हाताची, डोक्याची, शाळा परिसरातील वस्तु इ. याचा संबंध विद्यार्थ्यांना लावू द्यावा.

☞ अक्षरांचा वळणदारपणा बघण्यापेक्षा अक्षराची आकृती अन् त्याचा शब्द-संबंध अधिक बघावा.

☞ घरी, गावात, पाड्यांवर, टोल्यांवर बघितलेल्या वस्तु किंवा चित्र यांना बोलीभाषेतून बोलण्याला अन् लिहिण्याला प्रोत्साहित करावं.

☞ प्रश्न विचारायला संधी देणे तसेच बोलीभाषेत का होईना व्यक्त होण्यास प्रोत्साहित करावे, विद्यार्थ्यांचेच गट पाडून, त्यांना परस्परांना प्रश्न विचारून उत्तर देण्याचा खेळ वर्गात घेणे.

जन्मापासून ते शाळेत पहिल्या वर्गात दाखल होईपर्यंत आश्रमशाळेतील मुला-मुलींच्या कानावर, त्यांच्या अनुभवात त्यांची बोलीभाषाच असते. शाळेत आल्याबरोबर लगेच त्यांचे 'मराठी'मधून शिक्षण सुरू होते. आदिवासी मुला-मुलींच्या एकूण शिक्षण-प्रक्रियेतील हा मोठा धक्का असतो. यामुळे कदाचित त्यांचे सर्व पुढील शिक्षण प्रभावित होऊ शकते. बोलीभाषेकडून मराठी शिक्षणाकडची वाट सुगम अन् खेळकर व्हावी म्हणून ही कार्यपुस्तिका. अर्थात आश्रमशाळांमधील शिक्षकांनी परिस्थिती अन् गरजेनुसार ही कार्यपुस्तिका उपयोगात आणावी. यात काही बदल किंवा भर टाकावयाची असेल तर त्याबद्दल जरूर कळवावे.

●

माझे पान

(शिक्षकांसाठी)

- **प्राण्यांच्या चित्रावर बोट ठेवून मोठ्या आवाजात त्यांची नावं सांगा.**
- **विद्यार्थ्यांना शक्य त्या प्राण्याचे वर्णन करायला सांगून त्या प्राण्याचे आवाज काढायला सांगा.**
- **गटातून अशी कृती घेता येऊ शकते.**
- **चित्रात नसलेले पण विद्यार्थ्यांच्या ओळखीचे प्राणी कोणते?**

हे विचारून, त्या प्राण्याचे खाद्य, आवाज, त्याचं पिल्लू याबाबत विचारा.

तो चित्र काढ, आन रंगवे.

(चित्र काढ आणि रंगव.)

- **चित्राम नाय हाय पेन पोयरांहान मालुम हाय अेंहेंडे जनावरे केलें हाय.**

(चित्रात नसलेले पण विद्यार्थ्यांना परिचित असे प्राणी कोणते?) बोट ठेवून विद्यार्थ्यांना बोलू द्या.

इतर प्राणी : बोइल (बैल), बोकडी (बकरी), कुकडो (कोंबडा), कुकडी (कोंबडी), डुकरो (डुक्कर), उंदऱ्यो (उंदीर) हाप (साप), विशी (विंचू), चिरखुली (चिमणी), नेडाडों (कावळा), मोहडी (म्हैस), पाडा (रेडा), फुरक्यों (गाढव), पायरूळो (कबूतर), सिअली (पाल), कुअली (खेकडा), आसाली (अस्वल), हेअडों (सरडा), बिबय्यों (बिबट्या), कोलो (कोल्हा), तरसो (तरस)या प्राण्यांच्या नावावरून मुलांना बोलते करा.



गाय (गावडी) **कुत्रा** (हुणों)

हत्ती (आथी) **कासव** (काशी)

मासा (मासो) **माकड** (केल्यों)

फुलपाखरू (टिंगली)

पक्षी (चिडों)

बेडूक (डेडको)

अळी (ओलो)

बोइल (बैल)

कुकडो (कोंबडा)

डुकरो (डुक्कर)

उंदऱ्यो (उंदीर)

हाप (साप)

चिरखुली (चिमणी)

नेडाडों (कावळा)

मोहडी (म्हैस)

चित्र कथा

मन्हा खेवाना (माझे खेळ)

चित्रों ऐरा. चित्रांम काय काय देखाय तों आखा? (चित्र बघ, चित्रात काय काय दिसते ते सांग?)



चित्र - १ **आंधळी कोशीबीर** (पाटो बांदिन रोवनु)

१. चित्रांम कोतेहें पोयरें रोवतेहें?

(चित्रात किती विद्यार्थी खेळत आहेत?)

२. पोयरा डोवो केहेंडाकी बांदलो आथो?

(मुलाचे डोळे कशाने बांधलेले आहेत?)

चित्र - २ **लगोरी** (टिपऱ्या पाडी रोवनू)

१. कोअ, गावाम आने आमां शाळामं तूमा रोवतेहें का?

(घरी, गावात व आता शाळेत तुम्ही खेळता का?)

२. ओ रोवसो रवाखातर काय काय वस्तू लागी?

(हा खेळ खेळायला कोणकोणते साहित्य लागते?)

३. ओ रोवसो कोता जां रोवतेहें?

(हा खेळ किती जण खेळतात?)

चित्र - ३ **कॅरम**

१. कॅरम केहेंडा रेहे?

(कॅरम कशाचा असतो?)

२. केंहकी रोवते हें?

(कसा खेळतात?)

३. कोताजां रोवताहा?

(किती जण खेळतात?)

४. टिपऱ्या केल्ला - केल्ला रंगा रेत्याहा?

(गोट्या कोणकोणत्या रंगाच्या असतात?)

५. राणी रंग केलों रहे? (राणीचा रंग कोणता?)

६. कॅरम किहीं देख्यो तुमांहांय?

(कॅरम कुठे बगीतला आहे?)

चित्र - ४ **हापसिडी** (सापशिडी)

१. हापसिडी तुमा रोवताहा का?

(सापशिडी तुम्ही खेळता का?)

२. हापसिडी रोवसो रोवाखातर केल्या-केल्या वस्तू लागत्याहा?

(सापशिडी खेळ खेळण्यासाठी कोणकोणते साहित्य लागते?)

मन्हा खेवाना (माझे खेळ)

(शिक्षकांसाठी)

- विद्यार्थी गावी अन् शाळेत काय खेळतात?

हे विचारून त्यांना खेळांची नावं आणि त्याचे वर्णन करण्यास प्रोत्साहित करा. खेळ, जसे - लंगडी, टिक्कर बिल्ला, भस्सम कंचे, चौरस किंवा चौआष्टा इ.

इतर खेळाचं नावं - क्रिकेट, कबड्डी, खो-खो, गिल्ली-दांडू, सुरकाडी, खूपसणी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुद्धीबळ इ.

- वैयक्तिक खेळ : (एकट्याने खेळावयाचे) आणि
  सामुहिक खेळ : (चमूने खेळावयाचे) यातील फरक सोदाहरण सांगा.

मन्हा आऱ्या (माझे मित्र)

चित्रो एरा - तो आऱ्याहा बरांम आख. (तुझ्या मित्राविषयी सांग.)

चित्र १

१. तोआऱ्याहा नावे आख? (तुझ्या मित्रांची नावे सांग.)

२. तो कोता आऱ्या आहाय? (तुला किती मित्र आहेत?)

३. तो आऱ्या काहाय-काहाय हाय? (तुझे मित्र कुठे राहतात?)

४. गावामेंने आऱ्या केडा? (गावातले मित्र कोणते?)

५. तो आऱ्या काय केताहा? (तुझे मित्र काय करतात?)

.

चित्र २

१. तो आजी केडो आऱ्यो आहाय?
(तुला अजून कोणते मित्र आहेत?)

२. टिंगली- (फुलपाखरं) इतर.

३. तो केल्ला आऱ्याल गोगता नाहा आवतो?
(तुझ्या कोणत्या मित्रांना बोलता येत नाही?)

४. बादा तो पाहाय आवता का? (सर्व जवळ येतात का?)

५. तुल खुशी वाटेहे का? (तुला आनंद वाटतो का?)

६. डोगामेने (जंगलामेने) आऱ्या केडा?
(जंगलातले मित्र कोणते?)

चित्र ३

१. आपु पोंगाम केल्ले जनावरे रेतेहे?
(आपल्या घरात कोणते प्राणी राहतात?)

२. तू कुत्राव लाड केतोहो का? (तू कुत्र्याचे लाड करतो?)

३. बिलाडील काय आखतोहो? (मांजरीला काय म्हणतो?)

४. गावडी, वासडी, पोपट, टिंगली तुल पोटतेहें का?
हे प्राणी तुला आवडतात का?

चित्र -४

१. पायांम केड केडो रेहे? (पाण्यात कोण कोण राहतो?)

२. पायांमने केल्ले केल्ले जनावरे पोटतेहें?
(पाण्यातील कोणते प्राणी आवडतात?)

३. मासो तो आऱ्यो हाय का? (मासा तुझा मित्र आहे?)

४. मासाल खा काय देतोहों? (माश्याला खायला काय देतो?)

मन्हा आऱ्या (माझे मित्र)

(शिक्षकांसाठी प्रस्तावित उपक्रम)

- पाठ शिकविताना विचारा.
- विद्यार्थ्यांनो, तुमचे इतर मित्र कोण?
- जे बोलत नाहीत, सगळेच जवळ येत नाहीत. पण आसपास राहतात, आपल्याला आनंद देतात. असे कोण? - कुत्रा, मांजर, गाय, वासरू, चिमणी, पोपट, कबुतर, फुलपाखरू.
- **प्राण्यांची नावं -** (श्रेणीनुसार) - तोंडी वदवून घ्या. जसे,

- सरपटणारे, उडणारे, शेपटी असणारे, बिळात राहणारे, पाण्यात राहणारे, पाळीव (घरचे, पाड्यावरचे), जंगलात राहणारे.

- प्राण्यांची नावं, बोलीभाषा, मराठी आणि शक्य तिथे इंग्रजीमधून, चित्र दाखवून मुलांकडून वदवून घ्या.
- श्रेणीनुसार किमान एका प्राण्याचे तोंडी वर्णन करायला सांगा. प्राण्यांचे आवाज गटाकडून काढून घ्या.
- गटांमध्ये विभागून, भेंड्या, अंताक्षरी किंवा सांगा कोण? असे खेळ घेता येऊ शकतात.

आमना कुट (माझे कुटुंब)

• बोली भाषेनुसार मुलांना आपले घर व कुटुंबियांचे तोंडी वर्णन करू द्या. त्यांना सांगायला प्रोत्साहित करा.

या चित्राचे निरीक्षण करायला सांगून, विद्यार्थ्यांना वर्णन करू द्यावे.

चित्र परिचय (मुलांना चित्र वाचायला सांगा.) बोली भाषेत विचारा? (पाठातील चित्र)

१. चित्राम केंडे केडे देखाहाय?
(चित्रात कोण कोण आहेत?)

२. केंल्या वस्तूहाय?
(कुठल्या वस्तू आहेत?)

३. केडें-केडआरी गोगेहे?
(कोण कोणाशी बोलत आहेत?)

४. पोयरीय काय पुरों केयों?
(मुलीने काय पूर्ण केले?)

५. पोयरी केडाहांय जाहाय?
(मुलगी कोणाकडे जात आहे?)

६. मुलीचे बाबा कुठे आहेत?
(मुलीचे बाबा कुठे आहेत?)

७. चित्राम आजलीही-आजलोहो हाय का?
(चित्रात आजी-बाबा आहेत का?)

८. पावोहो, बोहीं देखातेंहे का?
(चित्रात दादा-ताई आहेत का?)

झोपाळा गेला उडून

(बोली भाषेत विचारा.)

१. चित्राम काय काय देखाहाय?
(चित्रात काय दिसते?)
२. चित्राम कोता डेटका आहाय?
(बेडूक किती आहेत?)
३. ते डेडोर काय करी रयनत?
(बेडूक काय करत आहे?)
४. डेटको किही कुदेहें?
(बेडूक कुठे उडी मारतात?)
५. तिंयांहाय केहेडाल इंदलो बांध्योहो?
(त्यांनी कशाला झोका बांधला आहे?)

(शिक्षकांसाठी)
- याच धर्तीवर विद्यार्थ्यांना 'कबुतरं उडून गेलीत' ही कथा सांगावी.
- (शिकारी - जाळं - दाणे- कबुतरांचे अडकणे आणि एकी करून सर्वांनी जाळं घेऊन उडून जाणे.)





मा शाळा (माझी शाळा)

चित्र बघ. चित्रात काय काय दिसते ते सांग.

(प्रश्न विचारणे) (बोली भाषेत विचारा)

१. तुमा शाळा एहेकी हायाका?

(तुमची शाळा अशी आहे का?)

२. तुमा शाळा नाव काय?

(तुमच्या शाळेचे नाव काय?)

३. चित्राम पोयरे केल्ला रोवसा रोवतेहे?

(चित्रातील मुले कोणता खेळ खेळतात?)

४. बिजा चित्राम् काय काय देखाहाय?

(दुसऱ्या चित्रात काय दिसत आहे?)

५. बाई पोयरांहान काय हिकवेहे?

(बाई मुलांना काय शिकवते?)

६. पितडाव केहेडा चित्रं लागवुलो अहाय?

(भिंतीवर कशाचे चित्र लावले आहेत?)

७. पोयरे-पोयऱ्या कोते हाय?

(मुले-मुली किती आहेत?)

विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेचे वर्णन करायला सांगणे. तसे प्रश्न विचारावे.
उदा. किती वर्ग खोल्या आहेत?
किती शिक्षक आहेत?
शाळेला रंग आहे का?
असल्यास कुठला?
कुठली झाडं आहेत?
फळांची किती?
फुलांची किती?

चित्र क्र. १



चित्र क्र. २

गमती शोधा (गंमत शोधा)

चित्र बघ, त्यातल्या गंमती शोध, सांगा.
१. चित्रांम तुम्हांन काय देखाहे?
(चित्रामध्ये तुम्हाला काय दिसते आहे?)
२. तुम्हांन मालूम वेरी तियां जनावरा नावे आखा.
(तुम्हाला माहिती असलेल्या प्राण्याची नावे सांगा)
३. वाघ काय केहे?
(वाघ काय करतो आहे?)
४. चाडवाप केडों चोडेंहे
(झाडावर कोण चढत आहे?)



कुत्रा मांजर काय बोलतात

१. चित्रम काय दखाय?
(चित्रात काय दिसते?)
२. कोण कोण सत?
(कोण कोण दिसते?)
३. तुमनी घरम सत का?
(तुमच्या घरात आहेत का?)
४. कुत्रान मांजेर येरायेरला काय सांगी रहयनत?
(कुत्रा मांजर एकमेकांशी काय बोलत असतील?)
५. ते कोणीसंग खेइ रहयनत?
(ते कोणासोबत खेळत आहेत?)
६. तेसना आवाज काडी दखाळा?
(त्यांचे आवाज काढून दाखवा?)

चित्रात किती पिल्लं आहेत?
- **विद्यार्थ्यांना मोजून वर्णन करायला सांगा.**
- **विद्यार्थ्यांनी अजून इतर कुणाची पिल्लं बघितली आहेत. ते विचारा.**
- **चित्राचे बारकाईने निरीक्षण करून बोलायला सांगा.**



मांजराची गंमत

चित्र बघ, गोष्ट सांग.

बोलीभाषेत प्रश्न विचारा.

चित्र क्र.१

